48 वा
॥ वार्षिक अहवाल ॥
2022-23

# SMAK

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असो., कोल्हापूर

प्लॉट नं. पी–५९, स्मॅक भवन, एमआयडीसी, शिरोली, कोल्हापूर.

smakkop@gmail.com www.smakkolhapur.org



# JOURNEY
## TO THE FUTURE

Changing the Automobile World from ICE Engines to Electric Vehicles

## आयसी इंजिन ते इलेक्ट्रिक वाहने...





'स्मॅक'च्या स्वनिधीतून साकारले आयटीआय भवन



शासनाकडून स्मॅक आयटीआयला 'उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण संस्था' पुरस्कार

SMAK

SHIROLI MANUFACTURERS ASSOCIATION, KOLHAPUR

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, कोल्हापूर

## संचालक मंडळ



**श्री. दीपक पाटील**
अध्यक्ष



**श्री. एम. वाय. पाटील**
उपाध्यक्ष



**श्री. श्यामसुंदर तोतला**
ऑ. सेक्रेटरी



**श्री. जयदीप चौगले**
ट्रेझरर



**श्री. राजू पाटील**
चेअरमन, स्मॅक आय.टी.आय.
(एप्रिल २०२३ पर्यंत)



**श्री. प्रशांत शेळके**
चेअरमन, स्मॅक आय.टी.आय.



**श्री. नीरज झंवर**
चेअरमन, स्मॅक फौंड्री क्लस्टर



**श्री. अमर जाधव**
चेअरमन, स्किल ट्रेड प्रमोशन कमिटी



**श्री. सुरेंद्र जैन**
व्यवस्थापकीय संचालक,
कोल्हापूर फाउंड्री क्लस्टर



**श्री. अतुल पाटील**
संचालक



**श्री. सचिन पाटील**
संचालक



**श्री. जयदत्त जोशीलकर**
संचालक



**श्री. भरत जाधव**
संचालक



**श्री. सोहन शिरगावकर**
स्वीकृत संचालक



**श्री. रवी डोली**
स्वीकृत संचालक



सं. क्र. नं. ७५/२०२३-२४ दिनांक : १४/०९/२०२३

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, कोल्हापूर या संस्थेची ४८वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दिनांक ३०/०९/२०२३ रोजी सायंकाळी ठीक ४:०० वाजता स्मॅक भवन, श्री रामप्रताप झंवर सभागृह, पी-५९, एम.आय.डी.सी., शिरोली येथे बोलविण्यात आलेली आहे. तरी कृपया आपण सभेला उपस्थित रहावे ही विनंती. सभेतील कामकाजाची विषयसूची खालीलप्रमाणे आहे.

### विषयसूची

१. दि. २१/१२/२०२२ रोजी झालेल्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.
२. कार्यकारिणीने शिफारस केलेल्या सन २०२२-२३ सालचा अहवाल, जमा-खर्च व ताळेबंदास मंजुरी देणे.
३. कार्यकारिणीने शिफारस केलेल्या सन २०२३-२४ सालच्या अंदाजपत्रकास व अहवाल सालात झालेल्या ज्यादा खर्चास मंजुरी देणे.
४. सन २०२३-२४ सालाकरिता ऑडिटरची नेमणूक करणे व मानधन ठरविणे.
५. सन २०२३-२०२८ सालाकरिता निवडून आलेल्या नवीन संचालक मंडळाची निवड जाहीर करणे.
६. मा. अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या सभासदांनी सुचविलेल्या विषयांवर चर्चा करणे.

(कार्यकारी मंडळाच्या हुकूमावरून)

**एम. वाय. पाटील**
उपाध्यक्ष

### सूचना :

- गणसंख्येअभावी सभा स्थगित झाल्यास ही सभा त्याच ठिकाणी व त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर भरेल व त्या सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.
- ज्या सभासदांना वार्षिक कार्यवृत्तांत, जमा-खर्च, ताळेबंद, अंदाजपत्रक यांबाबत प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दि. २२/०९/२०२३ पूर्वी लेखी कळवावे.
- कृपया सभेस येताना हा अहवाल आणावा.

**D. Y. Bhumkar & Co.**
**Chartered Accountants,**
Jai Dhaval, Laxmipuri, Kolhapur - 416002

## तपासणी दाखला

प्रति,

**मा. सभासद बंधू-भगिनी, शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, कोल्हापूर**

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, कोल्हापूर या संस्थेच्या जमा-खर्चाच्या पुस्तकांवरून दिनांक १/४/२०२२ ते ३१/३/२०२३ या कालावधीचे लेखापरीक्षण आम्ही केलेले असून, आमच्या अलाहिदा दिलेल्या अहवालातील शेऱ्यास पात्र राहून दाखला देतो की,

१. सोबत जोडलेले हिशेबी ताळेबंद पत्रक आणि उत्पन्न व खर्चपत्रक संस्थेच्या हिशेबी पुस्तकांशी जुळत आहेत.

२. आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती व खुलाशावरून

अ) सोबत जोडलेले ताळेबंद पत्रक, संस्थेच्या दिनांक ३१/३/२०२३ अखेरच्या आर्थिक परिस्थितीची व

ब) सोबत जोडलेले उत्पन्न व खर्चपत्रक दिनांक ३१/३/२०२३ अखेर संपणाऱ्या वर्षाच्या उत्पन्नाची स्थिती दर्शवत आहे.

स्थळ : कोल्हापूर
**दिनांक : १३/०९/२०२३**

**डी. वाय. भूमकर आणि कंपनी**
चार्टर्ड अकौंटंट्स

# 'स्मॅक'च्या कार्याचा लौकिक...!



'स्मॅक आयटीआय' देशात सर्वोत्कृष्ट बन...

प्रशस्थ राम; 'स्मॅक आयटीआय भवन'चे उद्घाटन

स्मॅक आयटीआयमधील आठ विद्यार्थ्यांची निवड

...'ला उत्कृष्ट संस्था पुरस्कार

...पूरचे उत्पादन जागतिक नकाशावर आणण्यास सहकार्य

वीज दरवाढ रद्द करण्याची मागणी

औद्योगिक संघटनांची महावितरणच्या कार्यालयासमोर निदर्शने

'महावितरण'समोर उद्योजकांचा एल्गा...

निवेदन; समायोजित इंधन आकार कमी करण्याची मागणी

कोल्हापूरची उत्पादने जागतिक नकाशावर आणणार

रॉब अँडरसन : फौंड्रीमधील ऊर्जा कार्यक्षमतेचे तंत्रज्ञान हस्तांतरणास मदतीचे आश्वासन

वीज दरवाढ रद्द करा, अन्यथा...

कोल्हापुरातील उद्योजकांचा इशारा : महावितरण कार्यालयासमोर निदर्शने

'स्मॅक'च्या आयटीआय भवनचे उद्घाटन

...पूरचे उत्पादन जागतिक नकाशावर यावे : रॉब अँडरसन

'स्मॅक आयटीआय'ला उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुरस्कार

स्मॅक आयटीआयला उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुरस्कार

शिरोली एमआयडीसीत लवकरच अग्निशामक कें...

'स्मॅक'ला उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण पुरस्कार

सकाळ

'स्मॅक' आयटीआयला उत्कृष्ट प्रशिक्षण संस्था पुरस्कार





## भावपूर्ण श्रद्धांजली

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन कोल्हापूर (स्मॅक)चे अध्यक्ष

## श्री. दीपक पाटील

दु:खद निधन
सोमवार,
दि. ४ सप्टेंबर, २०२३



अजातशत्रू व्यक्तिमत्व!




'स्मॅक भवन'मध्ये शोकसभा



**श्री. दीपक पाटील**

## अध्यक्ष

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, कोल्हापूर

# मनोगत

सन्माननीय सभासद बंधू आणि भगिनींनो,
आपणा सर्वांना सस्नेह नमस्कार,

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन कोल्हापूर 'स्मॅक'चा अध्यक्ष म्हणून गतवर्षातील केलेल्या कामांबद्दलचे मनोगत व्यक्त करताना मला आनंद होत आहे. 'स्मॅक'चा ४८ वा वार्षिक अहवाल आपल्यासमोर प्रस्तुत करीत आहे.

सन २००८ साली 'स्मॅक'मध्ये मी संचालक म्हणून निवडून आलो. सन २०१३ ते १६ या कालावधीत मला स्मॅक आयटीआय चेअरमनपदी काम करण्याची संधी मिळाली. सन २०१९ ते २०२० या कालावधीत 'स्मॅक'च्या व्हाईस चेअरमनपदी व सन २०२१ ते २०२३ करिता 'स्मॅक'च्या अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली.

०६ जानेवारी, २०२३ रोजी माझी 'स्मॅक'च्या अध्यक्षपदी, तर उपाध्यक्षपदी श्री. एम. वाय. पाटील यांची सर्वानुमते फेरनिवड करण्यात आली तसेच ट्रेझररपदी श्री. जयदीप चौगले, ऑ. सेक्रेटरीपदी श्री. शामसुंदर तोतला यांची निवड करण्यात आली. आयटीआय चेअरमनपदी राजू पाटील, शिरोली सॅण्ड रिक्लेमेशन प्लांटच्या चेअरमनपदी श्री. नीरज झंवर यांची फेरनिवड करण्यात आली.

सन २०२२-२३ या वर्षाचा आढावा घेत असताना माझे सर्व सहकारी, पदाधिकारी व संचालक मंडळ, स्वीकृत संचालक, निमंत्रित सदस्य आणि सभासदांनी केलेल्या सहकार्याबद्दल सर्वांचे आभार.

'स्मॅक'द्वारा केलेल्या कार्यात्मक बाबींचा आढावा आपल्या अवलोकनार्थ या अहवालामध्ये फोटोसह प्रस्तावित करीत आहे. यातील काही महत्त्वाच्या बाबींचा मनोगतात उल्लेख करत आहे. उद्योगांना कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करण्यासाठी केंद्र शासनाकडून संस्थेस इंडस्ट्रिअल क्लस्टर्सअंतर्गत एक कोटीचा स्ट्राईव्ह प्रोजेक्ट मंजूर करण्यात आला आहे. या प्रकल्पास जागतिक बँकेकडून अर्थसहाय्य प्राप्त झाले आहे.

'स्मॅक' कार्यान्वित एसईपी प्रकल्पांतर्गत अमेरिकन कॉन्सलेट जनरलचे आंतरराष्ट्रीय जनसंपर्क अधिकारी रॉब अँडरसन यांनी शिरोली औद्योगिक क्षेत्रास भेट देऊन मार्गदर्शन केले व कोल्हापूरची उत्पादने जागतिक नकाशावर आणण्यास सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

स्मॅक आयटीआयची नवीन इमारत स्वनिधीमधून बांधून पूर्ण करण्यात आली व या इमारतीचे उद्‌घाटन कमिन्स इंडिया लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. अश्वत राम यांच्या हस्ते व त्यांच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. आयटीआयच्या नवीन इमारत उभारणीसाठी उत्स्फूर्तपणे स्वतः सहभाग घेऊन काम केल्याबद्दल श्री. राजू पाटील व श्री. राजाभाऊ वारनूळकर यांचे आभार.

कमिन्स इंडिया लिमिटेड या कंपनीकडून अमेरिकेतील अमेट्रोल कंपनीकडून आयटीआयला ट्रेनिंग किट देण्यात आले आहे. राज्य शासनाकडून एका शानदार सोहळ्यामध्ये स्मॅक आयटीआयला उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुरस्कार देण्यात आला.

'स्मॅक'द्वारा प्रथमच स्मॅक प्रीमिअर लीग एसपीएल टेनिसबॉल क्रिकेट स्पर्धेचे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शास्त्रीनगर -कोल्हापूर मैदानावर यशस्वी आयोजन करण्यात आले.

महावितरण कंपनीतर्फे सातत्याने केली जाणारी वीज दरवाढ, वीज समस्या, शिरोली क्षेत्रात अग्निशमन केंद्र व्हावे, कोल्हापूरच्या विमानसेवेचे विस्तारीकरण, ग्रामपंचायत मालमत्ता करामध्ये भरघोस वाढ, केएमटी बसेसची नियमितता, एमआयडीसीकडून मागील काळातील जीएसटी वसुली, सर्व एचटी व एलटी औद्योगिक ग्राहकांच्या हितासाठी रिट दाखल करणे, सभासद उद्योगांच्या कारखान्यामधील घनकचरा उठाव, शिरोली औद्योगिक क्षेत्रात एलईडी स्ट्रीट लाईट फिटिंग बसविणे, पाच डॉक्टर्स सेवा दवाखाना मंजुरी, या व अन्य कामांसाठी सतत प्रयत्न करीत आहोत. जिल्हा उद्योग केंद्राद्वारा उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी आयोजित उद्योगमित्र सभेच्या माध्यमातून उद्योजकांच्या समस्यांबाबत पाठपुरावा केला आहे.

स्मॅक बोर्डरूममध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचे कलातपस्वी जी. कांबळे यांनी रेखाटलेले मंत्रालयाच्या प्रवेशद्वारावर असलेले मोठे चित्र व राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शिकारी वेशभूषेतील मोठे चित्र रिपेंटिंग करून आकर्षक फ्रेममध्ये बसविण्यात आले. बोर्डरूममध्ये घडणाऱ्या निर्णय प्रक्रियेकडे महाराज पाहात आहेत, असा भास या चित्रामधून आपल्याला होतो.

'स्मॅक'च्या सन २०२३-२८ साठीच्या पंचवार्षिक निवडणुकीत १३ पैकी १३ जागा बिनविरोध निवडून आल्या. गेल्या वीस वर्षांनंतर निवडणूक बिनविरोध झाली आहे. सन १९९८ पर्यंत 'स्मॅक'ची निवडणूक बिनविरोध होत होती; पण २००३ मध्ये संस्थेत निवडणूक झाली. यावेळी 'स्मॅक' निवडणूक बिनविरोध करावयाची, असे ज्येष्ठ उद्योजकांनी ठरविले. त्यास शंभर टक्के यश आले. बिनविरोधसाठी तब्बल वीस वर्षांचा कालावधी लागला. संघटन आणि नेतृत्व कौशल्य असणाऱ्या उद्योजकांना पाठिंबा देत सर्व सभासद उद्योजकांनी सहकार्याची भूमिका ठेवून निवडणूक बिनविरोध करीत एक चांगला आदर्श 'स्मॅक'मध्ये निर्माण केला आहे. विद्यमान संचालक श्री. एम. वाय. पाटील, श्री. अमर जाधव व श्री. जयदत्त जोशीलकर यांनी अनमोल साथ दिली. या निवडणुकीसाठी ॲड. अशोक उपाध्ये, श्री. हरिचंद्र धोत्रे व श्री. बाबासो कोंडेकर या त्रिसदस्यीय समितीने काम पाहिले. या समिती सदस्यांनी कार्य व्यवस्थित पार पाडल्याबद्दल त्यांनाही धन्यवाद. तर अशा या अहवाल कार्याला निरोप देऊया. पुन्हा एकदा सर्व सहकारी, सभासद, लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी कर्मचारी, पत्रकार इ.दी सर्वांचे मनापासून खूप खूप आभार... धन्यवाद...!







**श्री. एम. वाय. पाटील**

## उपाध्यक्ष

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, कोल्हापूर

# मनोगत

सर्व सन्माननीय सभासद बंधू-भगिनी,

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन कोल्हापूर 'स्मॅक' या आपल्या संस्थेच्या ४८व्या वार्षिक सभेत सर्वांचे हार्दिक स्वागत करतो.

सर्वप्रथम मी आपल्या उद्योजक सभासदांना 'स्मॅक'च्या ४८ व्या वार्षिक सभेनिमित्त शुभेच्छा देतो.

'स्मॅक'च्या निमंत्रित सदस्यपदी माझी सन २०१५ साली निवड करण्यात आली होती. सन २०१८ साली संचालक झाल्यानंतर ट्रेझर पदाची जबाबदारी देण्यात आली. सन २०२१ मध्ये मला उपाध्यक्षपद देण्यात आले.

या पदांवर काम करण्याचा मान मिळाला आणि उद्योजकांची सेवा करण्याची संधी मिळाली, याबद्दल मी सर्वांचा शतशः ऋणी आहे. मी आणि माझे सहकारी श्री. दीपक पाटील यांनी एकदिलाने काम केले. महत्त्वाच्या निर्णयावर आम्ही दोघे चर्चा करायचो.

प्रत्येक निर्णय घेत असताना ते मला विचारत असत.

सर्व सभासदांनी 'स्मॅक'ला सातत्याने सहकार्य केले आहे. त्यांनी केलेल्या सहकार्यामुळे आपल्या असोसिएशनचे कामकाज चांगल्या प्रकारे सुरू असून, केलेले कामकाज या अहवालामधून मांडण्यात आले आहे.

यातील काही महत्त्वाच्या बाबी मी मनोगतामधून व्यक्त करू इच्छितो.

सेमिनार्स आणि कार्यशाळा विशिष्ट क्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी देतात. संबंधित विषयांवर चर्चा करून नवीनतम माहिती आणि नवीन कौशल्य जाणून घेण्याकरिता 'स्मॅक'द्वारा दि इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन फौंड्री मेन, कोल्हापूर चॅप्टर तसेच शासन, संस्था व बँका यांच्या संयुक्त विद्यमाने विविध विषयांवर कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

श्री. दीपेंद्रसिंह खुशवाह, विकास आयुक्त उद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी स्मॅक भवनला भेट दिली व 'स्मॅक'द्वारा कार्यान्वित एसईपी, सॅण्ड रिक्लेमेशन प्लांट, आयटीआय व उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

शिरोली औद्योगिक क्षेत्रासमोरून जाणाऱ्या सहा पदरीकरण रस्त्याच्या एन्ट्री पॉईंट्ससंदर्भात हायवे ॲथॉरिटीचे असिस्टंट मॅनेजर श्री. संतोष घोलपसो व एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक आयोजित केली गेली. या बैठकीमध्ये हायवे ऑथॉरिटीने केलेले नियोजन व आपल्या अडचणींसह सूचना देण्यात आल्या.

खासदार धैर्यशील माने यांनी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये तसेच कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनमध्ये औद्योगिक प्रश्नांसंदर्भात तसेच हातकणंगले व शाहूवाडी तालुक्यांत प्रस्तावित एमआयडीसीसंदर्भात आयोजित बैठकीमध्ये समस्या मांडल्या.

'स्मॅक'ने घेतलेल्या पुढाकाराने जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने खासगी आस्थापनामधील २५० रिक्त पदांसाठी पहिल्या प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन केले गेले. 'स्मॅक'ने केलेल्या प्रचार व प्रसारामुळे मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. 'स्मॅक'ला सरकारी विभागाबरोबर संयुक्त आयोजनाचा 'पहिला बहुमान' मिळाला.

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिशताब्दी वर्षपूर्तीनिमित्त स्मृतिशताब्दी सांगता कार्यक्रम व कृतज्ञता पर्व २०२३ अंतर्गत शाहू मिल कोल्हापूर येथे आयोजित प्रदर्शनामध्ये औद्योगिकविश्वाबद्दलची माहिती तसेच फिल्म प्रस्तुत करण्यात आली. 'स्मॅक'च्या विशेष प्रयत्नांतून कोल्हापूर येथे निर्मित लक्ष्मी मोपेड औद्योगिक दालनामध्ये प्रदर्शित करण्यात आली, जे या प्रदर्शनाचे आकर्षण ठरले. जिल्हाधिकारीसो यांनी यासाठी विशेष कौतुक केले.

औरंगाबाद असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांबरोबर आयोजित बैठकीमध्ये औद्योगिक वसाहतीमधील कॉमन प्रश्नांवर चर्चा केली.

सन २०२२-२३ चा ४८ वा वार्षिक अहवाल, तपासणी दाखला, ताळेबंदपत्रक, उत्पन्न-खर्च पत्रक आम्ही आपल्यासमोर मंजुरीसाठी सादर केले आहे. संस्थेचे आर्थिक स्थैर्य उत्तम आहे.

संचालक मंडळ, तातडीच्या बैठकीमधून महत्त्वाच्या विषयांवर चर्चा-विनिमय करून विषय मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले गेले.

'स्मॅक'द्वारा उद्योगाशी निगडित विविध मान्यवरांच्या निवडी, नियुक्त्या आणि उपलब्धींबद्दल त्यांचा संचालक मंडळाच्या सभेमध्ये सत्कार करण्यात आला.

'स्मॅक'चे प्रमुख स्तंभ - स्मॅक आयटीआय, स्मॅक फौंड्री क्लस्टर या सर्व ठिकाणी तेथील नेतृत्वांनी आपापल्या कमिटीबरोबर उत्कृष्ट काम केल्यामुळे 'स्मॅक'चे नाव आणखी द्विगुणित झाले आहे.

आपल्या संस्थेस वेळोवेळी बहुमोल सल्ला दिल्याबद्दल अधिवक्ता, चार्टर्ड अकाउंटंट व इतर मान्यवरांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार. सर्व संलग्न असोसिएशन्स, चेंबर, संलग्न संस्थानी केलेल्या सहकार्याबद्दल आभार.

माझे सर्व सहकारी, सभासद, लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी कर्मचारी, प्रिंट, इलेक्ट्रॉनिक मीडियाचे प्रतिनिधी, ज्ञात-अज्ञात लोकांचे मनापासून आभार.

यामधूनही नजरचुकीने कोणाचा उल्लेख करायचा राहिल्यास क्षमस्व.

आपण माझ्यावर दिलेल्या जबाबदारीचे कार्य यशस्वीपणे पार पाडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. आगामी वार्षिक सभेस आवर्जून उपस्थित राहावे हीच प्रेमळ सदिच्छा. शेवटी मी सर्वांना धन्यवाद देऊन मनोगताला पूर्णविराम देतो.

धन्यवाद...!



**श्री. राजू पाटील**
चेअरमन
स्मॅक आय.टी.आय.
(कार्यकाल एप्रिल २०२३ पर्यंत)

## मनोगत

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन कोल्हापूर या संस्थेच्या ४८ व्या वार्षिक सभेच्या अहवालात स्मॅक ट्रेनिंग कमिटीचे चेअरमन म्हणून मनोगत व्यक्त करताना विशेष आनंद होत आहे. माझ्या चेअरमनपदाच्या कालावधीमध्ये महत्त्वाच्या व विशेष गोष्टींचा उल्लेख आवर्जून करणे मला आवश्यक वाटत आहे.

स्मॅक आयटीआयमध्ये सध्या फिटर, इलेक्ट्रिशन, ड्राफ्ट्समन, मेकॅनिकल व वेल्डर हे ट्रेड असून, मागील वर्षी टेक्निशियन मेकॅट्रॉनिक्स, मेकॅनिकल मोटर व्हेईकल, वायरमन व हाऊसकिपर या ट्रेडच्या मान्यतेकरिता शासनास प्रस्ताव दिलेला असून, त्यास लवकरच (एलओआय) मान्यता प्राप्त होईल. संस्थेसाठी अभिमानाची आणि कौतुकाची बाब म्हणजे सन २०२०–२१ मध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल राज्य शासनामार्फत ‘उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण संस्था’ पुरस्कार देण्यात आला. सदर पुरस्कारामध्ये १ लाख रोख रक्कम, प्रशस्तिपत्र व मानचिन्ह यांचा समावेश आहे.

आयटीआयकरिता १०००० स्क्वे. फुटांमध्ये बांधण्यात आलेल्या अद्ययावत नवीन इमारतीचा उद्घाटन सोहळा कमिन्स इंडिया लिमिटेडचे कार्यकारी संचालक, श्री. अश्वथ राम व त्यांचे पदाधिकारी, कमिन्स इंडियाचे पुरवठादार, ‘स्मॅक’चे संचालक व कारखानदार यांच्या उपस्थितीत थाटात संपन्न झाला.

या इमारतीमध्ये नवीन मागणी करण्यात आलेल्या प्रस्तावित ४ व्यवसायांचे वर्कशॉप करण्यात येणार आहेत. माहे जुलै २०२२ च्या अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा ‘दीक्षांत समारंभ’ दिनांक १७ सप्टेंबर २०२२ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून झंवर ग्रुपचे श्री. नरेंद्र झंवर, ‘स्मॅक’चे संचालक, स्टाफ व विद्यार्थी यांची प्रमुख उपस्थिती होती. सन २०२२ मधील प्रवेशित १६५ विद्यार्थ्यांना सेफ्टी शूज देण्यासाठी झंवर ग्रुपचे श्री. नीरज झंवर यांनी प्रायोजकत्व स्वीकारले, त्याबद्दल त्यांचे विशेष आभार.

आयटीआय चेअरमन म्हणून काम करीत असताना ‘स्मॅक’चे अध्यक्ष, उपाध्यक्ष, ऑन. सेक्रेटरी, ‘स्मॅक’चे सर्व संचालक, आयटीआयचे सर्व संचालक, प्राचार्य व स्टाफ यांचे बहुमोल सहकार्य लाभले त्याबद्दल धन्यवाद...! २१.०४.२०२३ पासून सदरील पदाचा कार्यभार हा श्री. प्रशांत शेळके यांच्याकडे सोपविण्यात आला.

---



**श्री. प्रशांत शेळके**
चेअरमन
स्मॅक आय.टी.आय.

## मनोगत

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन कोल्हापूर या संस्थेच्या ४८ व्या वार्षिक सभेच्या अहवालात स्मॅक ट्रेनिंग कमिटी चेअरमन म्हणून मनोगत व्यक्त करताना विशेष आनंद होत आहे. औद्योगिक क्षेत्रात गुणवत्तापूर्ण उत्पादन हा महत्त्वाचा उद्देश आहे. त्यासाठी गरज असते ती कुशल मनुष्यबळाची आणि हे महत्त्वपूर्ण काम स्मॅक आयटीआय अनेक वर्षांपासून करीत आहे.

शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ अंतर्गत मूलभूत प्रशिक्षण संस्थेची सुरुवात १९८० मध्ये झाली. संस्थेमध्ये फिटर, मशीनिस्ट व इलेक्ट्रिशन ट्रेडची मान्यता असून, सन २०२३ पासून ड्राफ्ट्समन मेकॅनिकल, वेल्डर व सीएनसी प्रोग्रॅमिंग कम ऑपरेटर या ट्रेडना शासनामार्फत मान्यता प्राप्त झाली आहे. एकूण ०६ ट्रेडअंतर्गत १२० विद्यार्थी या योजनेद्वारे प्रवेश घेऊ शकतील. या प्रशिक्षण योजनेचे राज्य आणि केंद्र संचालनालय परिषदांनी कौतुक केले आहे. स्मॅक औद्योगिक क्लस्टरला जागतिक बँकेमार्फत मंजूर झालेल्या स्ट्राईव्ह प्रोजेक्टसाठी या नवीन कोर्सेसमार्फत कारखानदारांना स्किल्ड मॅनपॉवर मिळवून देणे सुलभ होणार आहे, तसेच प्रोजेक्टचा उद्देश पूर्ण होण्यास मदत होणार आहे. सत्र २०२३ करिता प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. आजपर्यंत ९५ टक्के प्रवेश पूर्ण झाले असून, उर्वरित लवकरच पूर्ण होतील. यावर्षी ५ मुलींनी प्रवेश घेतले आहेत. विशेष बाब म्हणजे मागील वर्षापासून फिटर या मेकॅनिकल व्यवसायामध्ये २ मुली प्रशिक्षण घेत आहेत. शासनाच्या महाडीबीटी पोर्टलमार्फत आयटीआयमधील प्रवेशित खुला प्रवर्ग सोडून इतर सर्व विद्यार्थ्यांना प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती ८० ते १०० % प्रमाणात मिळते. त्याकरिता २०२२–२३ मध्ये एकूण १०५ अर्ज प्राप्त झाले असून, ७१ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे. संस्थेमधील नव्याने बांधलेल्या इमारतीत ‘फायर फायटिंग सिस्टमचे’ इन्स्टॉलेशन पूर्ण झाले असून, विद्यार्थी व संस्थेच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून हे महत्त्वाचे आहे. बिल्डिंग कम्प्लिशन सर्टिफिकेटचे काम अंतिम टप्प्यात आहे. या जागेत ड्राफ्ट्समन मेकॅनिकल ट्रेड स्थलांतरित करण्याचे काम सुरू आहे. कमिन्स इंडिया लिमिटेडकडून भारतामध्ये पहिल्यांदाच इलेक्ट्रिशन ट्रेडकरिता अमेरिकेतील अमेट्रोल कंपनीकडून ३२ लाख किमतीचे ट्रेनिंग किट संस्थेला प्राप्त झाले आहे. यात एकूण २२ प्रकारचे प्रॅक्टिकल्स तसेच फॉल्ट फाइंडिंग मॉडेल समाविष्ट केले आहे. कमिन्स इंडियामार्फत अद्ययावत कॅम सॉफ्टवेअर ड्राफ्ट्समन मेकॅनिकल व्यवसायामधील कॉम्प्युटरवर इन्स्टॉल केले आहे. या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सीएनसी प्रोग्रॅम करणे सहजपणे शक्य होणार आहे, तसेच सदरच्या सॉफ्टवेअरचा उपयोग सभासद कारखानदार करू शकतात.

आयटीआय चेअरमन म्हणून काम करीत असताना ‘स्मॅक’चे अध्यक्ष, उपाध्यक्ष, ऑन. सेक्रेटरी, ‘स्मॅक’चे सर्व संचालक, आयटीआयचे सर्व संचालक, प्राचार्य व स्टाफ यांचे बहुमोल सहकार्य लाभल्याबद्दल धन्यवाद...!

### ट्रेनिंग कमिटी


श्री. जयदीप चौगले


श्री. भरत जाधव


श्री. सोहन शिरगावकर


श्री. रवी डोली


श्री. अविनाश चिकनीस


श्री. आय. ए. पाटील





**श्री. नीरज झंवर**
चेअरमन
सॅण्ड रिक्लमेशन प्लांट, शिरोली कोल्हापूर फौंड्री ॲण्ड इंजिनिअरिंग क्लस्टर

## मनोगत

### शिरोली सॅण्ड रिक्लमेशन प्लांट कमिटी


श्री. सुरेंद्र जैन


श्री. राजू पाटील


श्री. भरत जाधव


श्री. सचिन पाटील


श्री. अतुल पाटील


श्री. प्रवीण पटेल


श्री. रविकुमार केलिंगनिमठ


श्री. जयदत्त जोशीलकर

कोल्हापूर फौंड्री अँड इंजिनिअरिंग क्लस्टर या योजनेतून शिरोली औद्योगिक वसाहतीकरिता मंजूर झालेल्या व यशस्वीपणे सुरू असलेल्या सॅण्ड रिक्लमेशन प्लांटबाबतची सविस्तर माहिती आम्ही प्रत्येक मागील ‘स्मॅक’च्या अहवालांमध्ये वेळोवेळी देत आलेलो आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्याने सदरच्या शिरोली औद्योगिक वसाहतमधील सॅण्ड रिक्लमेशन प्लाटची घोडदौड यशस्वीरीत्या सुरू आहे, हे आज मनोगतातून मांडताना आनंद होत आहे. ज्येष्ठ उद्योजक कै. मा. श्री. रामप्रतापजी झंवर साहेबांचे या प्लान्टबाबत जे स्वप्न होते, ते पूर्ण होताना दिसत असल्याने या गोष्टीचा एक विशेष आनंदही होत आहे. कारण, त्यांच्या पुढाकाराने क्लस्टरचा भक्कम पाया उभा राहिला आहे.

माहे मे सन २०१७ ला सुरू झालेल्या आपल्या या सॅण्ड रिक्लमेशन प्लॉन्टमधून आजपर्यंत जवळजवळ १ लाख मेट्रिक टनापेक्षा जास्त सॅण्ड रिक्लेम केली आहे व जवळपास ५० पेक्षा जास्त सभासद कंपन्यांना त्याचा फायदाही झाला आहे. अगदी सुरुवातीस दोन–चार सभासद कंपन्यांना रिक्लेम सॅण्ड देण्यापासून सुरु झालेला आपला प्रयत्न ५० पेक्षा जास्त सभासदांपर्यंत पोहोचविण्यास आपण यशस्वी झालो आहोत. यातूनच आपण रिक्लेम सॅण्डच्या गुणवत्तेवर कशा पद्धतीने काम केले आहे हे दिसून येते.

रॉ मटेरियल फिनिश प्रॉडक्टचा सुयोग्य मेळ साधून सदरचा प्लान्ट हा २२०० ते २५०० मेट्रिक टनापर्यंत फिनिश प्रॉडक्ट डिस्पॅच करण्यातही यशस्वी झाला आहे, हेही मला आवर्जून मनोगतातून मांडावेसे वाटते. शिरोली सॅण्ड रिक्लमेशन प्लान्टचे रोजचे कामकाज सुरळीतपणे व्हावे, याअनुषंगाने ‘स्मॅक’च्या वतीने शिराली सॅण्ड रिक्लमेशन प्लान्ट कमिटीची निवड केली. या कमिटीच्या माध्यमातून सर्व कमिटी मेम्बर्स व कोल्हापूर फौंड्री ॲण्ड इंजिनिअरिंग क्लस्टरचे संचालक यांच्याकडून वेळोवेळी मार्गदर्शनही मिळत गेले. त्यामध्ये कै. श्री. दीपक पाटील अध्यक्ष स्मॅक, श्री. एम. वाय. पाटील उपाध्यक्ष, श्री. सुरेंद्र जैन एम. डी. कोल्हापूर फौंड्री ॲण्ड इंजिनिअरिंग क्लस्टर, श्री. राजू पाटील, श्री. भरत जाधव शिरोली सबक्लस्टरचे संचालक, श्री. सचिन पाटील, माजी अध्यक्ष कोल्हापूर फौंड्री ॲण्ड इंजिनिअरिंग क्लस्टर, श्री. प्रकाश राठोड, माजी संचालक कोल्हापूर फौंड्री ॲण्ड इंजिनिअरिंग क्लस्टर, श्री. अतुल पाटील, माजी संचालक कोल्हापूर फौंड्री ॲण्ड इंजिनिअरिंग क्लस्टर, श्री. प्रविण पटेल, श्री. के. रविकुमार, श्री. जयदत्त जोशीलकर, श्री. शामकुमार तोतला, श्री. रवि डोली या सर्वांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभत गेले. या सर्वांच्या सहकार्याने मागील पाच ते सहा वर्षांच्या कालावधीमध्ये शिरोली सॅण्ड रिक्लमेशन प्लान्टबाबत अनेक यशस्वी निर्णय घेण्यात आले. हा प्लान्ट आय.एस.ओ. ९००१:२०१५ चे प्रमाणपत्र मिळवण्यातही यशस्वी झाला आहे व त्यानुसारच त्याचे कामकाज होत आहे. सदरच्या प्लान्टसाठी येणाऱ्या महत्त्वाच्या खर्चामध्ये इंधन हा घटक खूप महत्त्वाचा आणि खर्चिकही आहे. एल.पी.जी., बायोगॅस व नॅचरल गॅस या तिन्ही इंधनांचा वापर उत्पादन प्रक्रियेसाठी केला जातो. तेव्हा वेळोवेळी सदरच्या इंधनाच्या दरावर लक्ष केंद्रित करून कमी दरामध्ये जे इंधन उपलब्ध होईल, त्याचा वापर करून खर्च कसा कमी होईल, यावर भर देऊन जादा नफा वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले गेले.

एक वेगळा प्रयोगही आपण करण्यात यशस्वी झालो. तो म्हणजे. फौंड्री वेस्ट सॅण्ड व आपल्या प्लान्टमधून निघणारे बिलो थर्टी ए.एफ.एस. ग्रेडच्या सॅण्डमधून ५००० स्क्वेअर फुटांपेक्षा जास्त आकाराचा रस्ता व टू व्हीलर पार्किंग प्लॅटफॉर्म तयार करण्यात आला आहे. याच्या मिश्रणाचे क्युब्स् तपासणीसाठी देण्यात आले आहेत. त्याचा अहवाल आल्यानंतर याची सविस्तर माहिती व्हिडिओग्राफीच्या माध्यमातून केंद्रीय स्तरावर पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे, तसेच भविष्यात काही प्रकल्प सुरू करण्याचे नियोजनही आहे, ज्यामध्ये प्रामुख्याने सोलर सिस्टिम, ऑटोमॅटिक सॅण्ड हॅन्डलिंग सिस्टिम, इत्यादी. त्याचप्रमाणे या प्लान्टची यशस्वी वाटचाल पाहता असाच आणखी एक सॅण्ड रिक्लमेशन प्लान्ट आपल्या शिरोली औद्योगिक वसाहतीकरिता शासनाकडून मंजूर करण्याचेही प्रयत्न सुरू आहेत.

तसेच गेल्या पाच–सहा वर्षांमध्ये अनेक मान्यवरांनी आपल्या या सॅण्ड प्लान्टला सदिच्छा भेटी दिल्या, ज्यामध्ये माननीय पृथ्वीराज चव्हाणसो, माजी मुख्यमंत्री, मा. आमदार सतेज ऊर्फ बंटी पाटीलसो, मा. आमदार ऋतुराज पाटीलसो, तत्कालीन जिल्हाधिकारी मा. श्री. दौलत देसाई व श्री. राहुल रेखावर, श्री. रॉब ॲण्डरसन पब्लिक डिप्लोमसी ऑफिसर, यू.एस. कौन्सिलेट जनरल तसेच महाराष्ट्र प्रदूषण महामंडळ, जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग विभाग, मुंबई या शासकीय विभागातील अधिकाऱ्यांनीही सॅण्ड प्लान्टला भेट देऊन कामकाजाची माहिती घेऊन पुढील वाटचालीसाठी सहकाऱ्याचे आश्वासन दिले आहे.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने खूप कमी वेळेत विविध अडचणींवर मात करीत आज हा प्लान्ट सर्वोच्च ठिकाणी कार्यरत होताना दिसत आहे. तसेच याच्या यशस्वी वाटचालीत सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले, त्याबद्दल सर्वांचे आभार...

धन्यवाद...!



**श्री. सचिन पाटील**
**अध्यक्ष**
(ऑक्टॉबर २०१५ ते मार्च २०२३)
कोल्हापूर फौंड्री अँण्ड इंजिनिअरिंग क्लस्टर

## मनोगत

कोल्हापूर फौंड्री अँण्ड इंजिनिअरिंग क्लस्टर अध्यक्ष म्हणून माझे मनोगत स्मॅकच्या अहवालामध्ये प्रत्येक वेळी देताना मला नेहमी आनंद होतो यावेळीही स्मॅकच्या ४८ व्या सर्वसाधारण सभेच्या अहवालाकरिता माझे मनोगत व्यक्त करताना तितकाच आनंद होत आहे. सन २०१२ पासून सुरु असलेला कोल्हापुर फौंड्री अँण्ड इंजिनिअरिंग क्लस्टर या प्रकल्पाचा प्रवास व्यवस्थित रित्या सुरु असल्याचे मला येथे आवर्जून मांडावेसे वाटते. जेष्ठ उद्योगपती कै. मा. श्री. रामप्रतापजी झंवर साहेब यांच्या पुढाकाराने क्लस्टरचा भक्कम पाया उभा राहिला आहे. या योजनेतून मंजूर झालेल्या घटकांपैकी शिरोली औद्योगिक वसाहत व गोकुळ शिरगांव औद्योगिक वसाहती करिता सँण्ड रिक्लमेशन प्लान्ट हे अत्यंत महत्वाचे असे प्रकल्प आहेत. पैकी शिरोली औद्योगिक वसाहतीमधील सँण्ड रिक्लमेशन प्लान्ट आजही सुरळीत सुरु आहे व गोकुळ शिरगाव औद्योगिक वसाहती मधील सँण्ड रिक्लमेशन प्लान्ट हा माहे मार्च २०२३ ते ४ सप्टेंबर २०२३ पर्यंत बंद होता. ५ सप्टेंबर २०२३ पासून गोकुळ शिरगांव औद्योगिक वसाहती मधील सँण्ड रिक्लमेशन प्लान्ट हा थर्ड पार्टीला चालवण्यास दिला आहे.

माहे मे २०१७ पासून सुरळीतपणे सुरु असलेला शिरोली औद्योगिक वसाहतीमधील सँण्ड रिक्लमेशन प्लान्ट हा गुणवत्तेच्या सर्व प्रक्रिया पार करत आज जवळजवळ १ लाख मेट्रिक टनापेक्षाही रिक्लेम सँण्ड त्यांच्या सभासदांना देण्यात यशस्वी झाला आहे. तसेच त्यांच्या उत्पन्नातून आज अखेर रक्कम रु. ३५ लाखांपर्यंत शिरोली सब क्लस्टरच्या जून्या कंत्राटदारांची देणी व सुरक्षा ठेव रक्कम अदा करण्यातही यशस्वी झाला आहे. त्यामुळे आज कोणतीच जूनी देणी देणे बाकी नसल्याचे सांगताना विशेष आनंद होतो. स्वतः च्या भाग भांडवलाचे व्यवस्थित नियोजन करून सर्व चालू देणीसुद्धा वेळेत देण्यात सदरचा प्लान्ट यशस्वी झाला आहे. तसेच रक्कम रु. १ कोटी हे स्मॅक असोसिएशनला त्यांच्या आय. टी. आय. ट्रेड मंजूरिकारिताही दिले आहेत. याव्यतिरिक्त रक्कम रु. २८ लाखांची बँक गॅरेंटी नॅचरल गॅस सप्लाय सदरच्या प्लॉन्टसाठी सुरु करण्याकरिता दिल्या आहेत आणि रक्कम रु. ५ लाखाची बँक गॅरेंटी एम.पी. सी.बी. कार्यालयाच्या कन्सेन्ट मिळण्याकरिता केली आहे. व जवळजवळ १ कोटी पेक्षा जास्त रुपयांच्या अँसेट अँडिशनस् ही शिरोली औद्योगिक वसाहतीमधील सँण्ड रिक्लमेशन प्लान्ट करण्यात यशस्वी झाला आहे. हे सर्व त्यांनी त्यांच्या उत्पन्नातून केल्याचे सांगताना मला आनंद होत आहे. चायना कडून आलेल्या मशिनरी बाबतही काही बाबतीत कार्यकुशलतेने बदल करुन उत्पादन कसे वाढेल यावरही लक्ष केंद्रीत केले गेले. जेणेकरून स्थानिक पातळीवर अशा मशिनरी करता येतील व भविष्यात त्या चायना कडून आयात करण्याची गरज भासणार नाही.

सर्वांच्या सहकार्याने कोल्हापूर फौंड्री अँण्ड इंजिनिअरिंग क्लस्टर या प्रकल्पातून मंजूर झालेली कामे पूर्ण झाली आहेत.

या सर्व कामासाठी, तसेच प्रकल्पामध्ये आलेल्या अडचणी सोडवण्याकरिता व प्रकल्प वेळेस सुरु करण्यासाठी ज्येष्ठ उद्योगपती कै. मा. श्री. रामप्रतापजी झंवर साहेब, माजी अध्यक्ष कोल्हापूर फौंड्री अँण्ड इंजिनिअरिंग क्लस्टर श्री. प्रकाश राठोड, माजी संचालक क्लस्टर, श्री. निरज झंवर, संचालक क्लस्टर श्री. अतुल पाटील, संचालक क्लस्टर तसेच कै. श्री. दिपक पाटील अध्यक्ष स्मॅक श्री. एम. वाय. पाटील, उपाध्यक्ष स्मॅक तसेच स्मॅक व क्लस्टरचे सर्व संचालक, निमंत्रित संचालक, सभासद यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य मिळाले त्या बद्दल मी या सर्वांचा ऋणी आहे तसेच या प्रकल्पातील आमचे सर्वच सब क्लस्टर यांचेही वेळोवेळी सहकार्य मिळाले त्याबद्दल या सर्व सब क्लस्टरचे आभार. त्याचबरोबर इतर संस्थांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष संचालक, शासकिय अधिकारी, पत्रकार बंधु, यांच्याही सहाकार्याबदल मी आभारी आहे. धन्यवाद...!



अमेरिकेच्या वाणिज्य दूतावासाचे आंतरराष्ट्रीय जनसंपर्क अधिकारी श्री. रॉब अँडरसन व सार्वजनिक सहभाग विशेषज्ञ अमृता डिमेलो यांची सँण्ड प्लान्टला सदिच्छा भेट.







**श्री. सुरेंद्र जैन**
**व्यवस्थापकीय संचालक**
(जून २०२३ पासून)
कोल्हापूर फौंड्री अँड इंजिनिअरिंग क्लस्टर

## मनोगत

स्मॅकच्या ४८ व्या सर्वसाधारण सभेच्या अहवालामध्ये कोल्हापूर फौंड्री अँण्ड इंजिनिअरिंग क्लस्टर व्यवस्थापकीय संचालक (एम.डी.) म्हणून मनोगत व्यक्त करताना मला फार आनंद होत आहे. कोल्हापूर फौंड्री अँण्ड इंजिनिअरिंग क्लस्टर योजनेतून कोल्हापूर जिल्ह्यातील पाच वेगवेगळ्या औद्योगिक वसाहतींकरिता त्यांच्या त्यांच्या औद्योगिक वसाहतीमधील गरजा लक्षात घेऊन प्रकल्प मंजूर झाले आहेत. शिरोली औद्योगिक वसाहत व गोकुळ शिरगाव औद्योगिक वसाहतीकरिता सँण्ड रिक्लमेशन प्लान्ट हा अत्यंत महत्त्वाचा असा प्रकल्प मंजूर झाला आहे. सदरचे दोनही प्लान्ट गेली ५ वर्षे व्यवस्थितरीत्या सुरू आहेत.

शिरोली सँण्ड रिक्लमेशन प्लान्टचे रोजचे कामकाज सुरळीतपणे व्हावे या अनुषंगाने 'स्मॅक'च्या वतीने शिरोली सँण्ड रिक्लमेशन प्लान्ट कमिटीची निवड केली. सदर कमिटीच्या सहकार्याने व मार्गदर्शनाने रोजचे कामकाज सुरळीत सुरू असल्याचे दिसून येते. सध्या रिक्लेम सँण्डची मागणी वाढत असल्याने शिरोली सबक्लस्टर आणखीन एका नव्या सँण्ड रिक्लमेशन प्लान्टच्या तयारीत असल्याचे दिसून येते, तसेच आणखीन काही नावीन्यपूर्ण प्रकल्पाचे नियोजनही स्मॅक सबक्लस्टर करत आहे, जसे सोलर सिस्टिम, ऑटोमॅटिक सँण्ड हॅन्डलिंग सिस्टिमअंतर्गत विकास, ज्यामध्ये अंतर्गत रस्ते, गटर्स, संरक्षक भिंत, वगैरे.

गोशिमा सबक्लस्टरने ही गेली ५ वर्षे त्यांचा सँण्ड रिक्लमेशन प्लान्ट उत्तमरीत्या चालवून त्यांच्या सरप्लस रकमेतून जवळपास ३ कोटी रुपये हे सर्व सभासदांना उपयोगी पडेल, अशा त्यांच्या स्किल सेंटर (सेंटर ऑफ एक्सलन्स)च्या उभारणीकरिता वर्ग केले आहेत. केंद्र व राज्य सरकारच्या निधीव्यतिरिक्त सदरची रक्कम स्किल सेंटर (सेंटर ऑफ एक्सलन्स) या त्यांच्या प्रकल्पाला वर्ग करण्यात गोशिमा सबक्लस्टर यशस्वी झाला. खरोखरच ही एक समाधानाची बाब आहे.

त्यामानाने स्मॅक सबक्लस्टरमध्ये गेल्या ५ वर्षांत सरप्लस नाही. त्याकरिता जून २०२३ पासून काही सुधारणांची सुरुवात केलेली आहे. त्यादृष्टीने येणाऱ्या काळात स्मॅक सबक्लस्टरचे विद्यमान संचालक व कमिटी मेंबर्स हेसुद्धा सामान्य सभासदांचे हित व गरजा लक्षात घेऊन काही उपक्रम करण्याचा मानस आहे, त्यासाठीसुद्धा कोल्हापूर फौंड्री अँण्ड इंजिनिअरिंग क्लस्टरचे सहकार्य राहील.

थोडक्यात सर्वांच्या सहकार्याने कोल्हापूर फौंड्री अँण्ड इंजिनिअरिंग क्लस्टर या प्रकल्पातून 'स्मॅक'साठी मंजूर झालेली कामे पूर्ण झाली आहेत.

या सर्व कामासाठी स्मॅक तसेच स्मॅक क्लस्टरचे सर्व संचालक, निमंत्रित संचालक, सभासद यांचे वेळोवेळी मार्गदर्शन आणि सहकार्य मिळाले, त्याबद्दल मी या सर्वांचा ऋणी आहे. तसेच या प्रकल्पातील आमचे उर्वरित सबक्लस्टर ल. क. आकिवाटे औद्योगिक सहकारी वसाहत लि., जयसिंगपूर, छत्रपती शाहू सहकारी औद्योगिक वसाहत लि., शिरोळ, कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन, कोल्हापूर, गोकुळ शिरगाव मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन व आय. आय. एफ. कोल्हापूर यांचेही वेळोवेळी सहकार्य मिळाले. त्याबद्दल या सर्व सबक्लस्टरचे आभार. त्याचबरोबर इतर संस्थांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, शासकीय अधिकारी, पत्रकार बंधू यांच्याही सहकार्याबद्दल मी आभारी आहे...

धन्यवाद...!



श्री. रॉब अँडरसन यांचे स्वागत.



विकास आयुक्त उद्योग विभाग महाराष्ट्र राज्य श्री. दीपेंद्रसिंह खुशवाह यांची सँण्ड प्लान्टला सदिच्छा भेट.



एनएपीएस स्कीमसंदर्भात आयोजित कार्यशाळेमध्ये सत्कारप्रसंगी ट्रेनिंग ऑफिसर, श्री. विजयकुमार व आरडीएटी मुंबईचे सहा. संचालक श्री. रोहन पाटील.





पंचमहाभूत लोकोत्सवामध्ये स्टॉलचे उद्घाटन करताना श्री. दीपक पाटील. दुसऱ्या छायाचित्रात आरडीएटी मुंबईचे सहा. संचालक श्री. रोहन पाटील.



श्रीमती सोनाबाई शं. जाधव
मूलभूत प्रशिक्षण केंद्र (बी.टी.सी.)



स्वर्गीय जवानमलजी गांधी
औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय)

# स्मॅक आयटीआय कार्यवृत्तांत...

जुलै २०२२ अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा 'दीक्षांत समारंभ' दिनांक १७ सप्टेंबर २०२२ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून झंवर ग्रुपचे श्री. नरेंद्र झंवर, 'स्मॅक'चे संचालक, स्टाफ व विद्यार्थी यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये प्रत्येक व्यवसायातून प्रथम तीन विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

पंचमहाभूत लोकोत्सव कणेरी मठ व राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृतज्ञता पर्व शाहू मिल कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनामध्ये संस्थेकडून स्टॉलची मांडणी करण्यात आली. ज्या माध्यमातून आयटीआय प्रवेशाबद्दल माहिती देण्याचे काम करण्यात आले. अप्रेंटशिप ॲक्ट १९६१ अंतर्गत एनएपीएस योजनेची माहिती सर्व कारखानदार व जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांना मिळावी याकरिता स्मॅक भवन येथे सेमिनार आयोजित करण्यात आला. त्याकरिता प्रमुख मार्गदर्शक म्हणून आरडीएटी मुंबईचे असिस्टंट डायरेक्टर, श्री. रोहन पाटील व ट्रेनिंग ऑफिसर श्री. विजयकुमार उपस्थित होते.

राज्यातील प्रशिक्षणार्थ्यांच्या तंत्रशिक्षणामध्ये कौशल्य निर्माण व्हावे याकरिता औद्योगिक प्रशिक्षण संस्था कळंबा, कोल्हापूर येथे घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शनामध्ये स्मॅक आयटीआयमधील 'ट्रान्समिशन ऑफ पावर बाय व्हेरियस ड्राईव्ह' या प्रोजेक्टला तृतीय क्रमांक मिळाला. यामधील प्रशिक्षणार्थी व निदेशक यांचे कौतुक करण्यात आले.

सिमटेक या कंपनीकडून कमिन्स इंडियामार्फत अद्ययावत 'कॅम सॉफ्टवेअर ड्राफ्ट्समन मेकॅनिकल व्यवसायातील कॉम्प्युटर्सवरती इन्स्टॉल केलेले आहे. या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून सीएनसी प्रोग्रॅम करणे सहजपणे शक्य होणार आहे. तसेच सदरच्या सॉफ्टवेअरचा उपयोग सभासद कारखानदार करू शकतात...



## इलेक्ट्रिशन ट्रेनिंग कीट

**कमिन्स इंडिया लिमिटेड यांच्याकडून भारतामध्ये पहिल्यांदाच इलेक्ट्रिशन ट्रेडकरिता अमेरिकेतील अमेट्रोल कंपनीकडून ३२ लाख किमतीचे ट्रेनिंग कीट संस्थेमध्ये प्राप्त झाले आहे. यामध्ये एकूण २२ प्रकारचे प्रॅक्टिकल्स तसेच फॉल्ट फाइंडिंग मॉडेल समाविष्ट करण्यात आलेले आहे.**







७७ व्या स्वातंत्र्यदिन ध्वजारोहण समारंभास उपस्थित संचालक.




## शासनाकडून स्मॅक आयटीआयला उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुरस्कार

'स्मॅक' संचालित स्वर्गीय जवानमलजी गांधी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुरस्कार देऊन गौरविले. शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागांतर्गत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत पुरस्कार देण्यात आला.

एक लाख रुपये रोख, प्रशस्तिपत्र व मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. कौशल्य विकास व रोजगारमंत्री मंगलप्रभात लोढा, वरिष्ठ मुख्य सचिव आशिष कुमार सिंग, आयुक्त डॉ. रामस्वामी व संचालक दिगंबर दळवी यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्काराचे वितरण झाले.

पुणे विभागातून नोंद असणाऱ्या ३७५ शासकीय व अशासकीय संस्थांमधून स्मॅक आयटीआयची निवड झाली.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिल्पकारागीर प्रशिक्षण योजना उत्कृष्टपणे राबवून उद्योगक्षेत्रात आवश्यक तंत्रकुशल मनुष्यबळाची मागणी पूर्ण करण्याचे कार्य करणाऱ्या संस्थांना उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.

सन २०२०-२१ करिता स्मॅक आयटीआयने सहभाग नोंदवून पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनमध्ये संस्थेची माहिती दिली. याबाबत आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव सादर केला होता. पुणे विभागातील पाच जिल्ह्यांमधून उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण संस्था म्हणून 'स्मॅक' संचलित स्वर्गीय जवानमलजी गांधी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस पुरस्कार मिळाला...



दीक्षांत समारंभात उद्योगपती श्री. नरेंद्र झंवर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण.





२०१७ साली स्मॅक आयटीआय भवन इमारतीची पायाभरणी करताना कमिन्स इंडिया लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. संदीप सिन्हा.

# ‘स्मॅक’च्या स्वनिधीतून साकारले आयटीआय भवन

**शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, कोल्हापूर स्मॅक संचलित श्रीमती सोनाबाई शं. जाधव मूलभूत प्रशिक्षण केंद्र बीटीसी व स्व. जवानमलजी गांधी औद्योगिक प्रशिक्षण संस्था आयटीआयच्या नूतन वास्तू ‘स्मॅक आयटीआय भवन’ या इमारतीचे उद्‌घाटन कमिन्स इंडिया लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. अश्वथ राम यांच्या हस्ते करण्यात आले.**

**स्मॅक आयटीआय ही महाराष्ट्रातील अव्वल प्रशिक्षण संस्था असून, या संस्थेस देशात अव्वल बनविण्यासाठी लागेल ती मदत कमिन्स करण्यास तयार असल्याचे मत अश्वथ राम यांनी यावेळी प्रतिपादन केले. स्मॅक आयटीआयला देशात सर्वोत्कृष्ट बनावा यासाठी कमिन्स इंडियाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य राहील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.**

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन कोल्हापूर ‘स्मॅक ’च्या दिनांक ५ मार्च २०१७ रोजी माझ्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या संचालक मंडळ सभेमध्ये आयटीआय चेअरमन श्री. सुरेंद्र जैन यांनी स्मॅक आयटीआयसाठी नवीन इमारत बांधण्यात यावी, हा विषय मांडला होता. सदर सभेमध्ये या इमारतीच्या बांधकामासाठी येणाऱ्या खर्चाबाबत रु. ११ लाखांचे ११ सदस्यांकडून आर्थिक योगदान घेऊन इमारत पूर्णत्वास न्यायचे ठरले. त्यासाठी आर्किटेककडून अंदाजे रुपये दोन ते तीन कोटींचा एक मास्टर प्लॅन तयार करून पैशाची जशी व्यवस्था होईल, त्याप्रमाणे मास्टर प्लॅनचे नियोजन करण्याचे ठरले.

यासाठी मेनन ग्रुपचे श्री. विजय मेनन यांनी सहमती दर्शवित सुरुवातीस रु. सात लाखांची प्राथमिक स्तरावर आर्थिक मदत देऊ केली.

‘स्मॅक आयटीआय भवन’ या वास्तूचा पायाभरणी कार्यक्रम कमिन्स इंडिया लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. संदीप सिन्हा यांच्या हस्ते आयटीआयचे चेअरमन श्री. सुरेंद्र जैन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

इमारत निधीसाठी बऱ्याच लोकांनी सहमती दिली होती व काही लोकांची सहमती अजूनही यायची बाकी होती. त्यानंतर थोडासा हा विषय प्रलंबित राहिला. सन २०२० साली उद्‌भवलेल्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लोकांकडे देणगी मागणे उचित नव्हते, यामुळे एक वर्षासाठी हा विषय प्रलंबित राहिला व याचेवरती काम करणे जमले नाही.

सन २०१९ मध्ये माझी स्मॅक आयटीआय चेअरमनपदी निवड करण्यात आली. माझ्या निवडीनंतर इमारत बांधणीच्या या प्रोजेक्टवर मी काम सुरू केले. त्यासाठी श्री. राजाभाऊ वारनुळकर यांच्याबरोबर समक्ष चर्चा करून काटकसरीने बांधकामासाठी अंदाजित किती खर्च येईल, हे जाणून घेतले, ज्या अन्वये आपण स्वनिधीतून ही इमारत उभी करू शकतो. याचा अंदाज मला त्यावेळी आला. कारखानदार अडचणीत असताना त्यांना पुन्हा अडचणीत आणायला नको, या विचाराने त्यांच्याकडे आम्ही देणगी मागितली नाही. मग भलेही ही इमारत पूर्ण होण्यास एखादे वर्ष जादा लागले तरी बेहत्तर असे ठरवून नवीन इमारतीचे बांधकाम आम्ही सुरू केले.

बांधकामाच्या सुरुवातीस काही लोकांचे असे मत आले की, निविदा काढून कॉन्ट्रॅक्टरद्वारे हे काम करण्यात यावे. परंतु, निविदेसाठी लागणाऱ्या निधीची तरतूद नसल्याने हा विषय जाणून-बुजून प्रलंबित ठेवण्यात आला व जसजशी रक्कम जमा होईल, तसतसे काम सुरू करण्याचे राजाभाऊ यांना सांगितले गेले.

त्यावेळी संस्थेकडे तीस ते चाळीस लाख रुपये शिल्लक होते. पहिल्या वर्षी रु. ३० ते ३५ लाख इतकी रक्कम इमारत बांधकामासाठी खर्च झाली, तर दुसऱ्या वर्षीसुद्धा तितकीच रक्कम खर्च झाली. त्यानंतर सदरील इमारत बांधकाम पूर्ण करण्याच्या दृष्टीने विचारविनिमय सुरू करून देणगी स्वरूपातून रक्कम जमा करण्याचे ठरले. त्यानंतर तीन वर्षांचा यथोचित काळ संपून दहा हजार स्क्वेअर फूट जागेमध्ये रुपये एक कोटीची ही इमारत मोठ्या डौलाने आज उभी राहिली आहे.

श्री. राजाभाऊ वारनुळकर यांना देखभाल खर्च देऊन ही इमारत बांधून घेतली. त्यांनी अथक परिश्रम घेऊन ही इमारत पूर्णत्वास नेली. या कामी त्यांचे मिळालेले मोलाचे योगदान हे खरोखरच वाखाणण्याजोगे अन् कौतुकास्पद आहे. त्याबद्दल स्मॅक आयटीआय त्यांचा ऋणी राहील. ‘स्मॅक’चे तत्कालीन अध्यक्ष श्री. अतुल पाटील व विद्यमान अध्यक्ष श्री. दीपक पाटील यांनी मनोभावे मला सहकार्य केले, त्याबद्दल त्यांचेही आभार. सर्वांच्या केलेल्या सहकार्यामुळेच इमारत आजमितीस पूर्णत्वास आली.

एक चांगला हेतू मनात ठेवून जर एखादे काम हाती घेतल्यास ते काम पूर्णत्वास जाते, याचे हे एक मूर्तिमंत उदाहरण म्हणता येईल. ज्याचा मला व माझ्या सहकारी संचालकांनासुद्धा सार्थ अभिमान आहे.

या नवीन इमारतीमध्ये नवीन ट्रेडचे अभ्यासक्रम सुरू करून आणखीन विद्यार्थ्यांना यामध्ये सामावून घेता येईल आणि कुशल मनुष्यबळाची गरजही भागेल.

राष्ट्र घडविण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून सदरील इमारत बांधकाम करण्याचे मोठे भाग्याचे कार्य मला लाभले, त्याबद्दल पुनःश्च एकदा सर्वांना मनापासून धन्यवाद...

**– श्री. राजू तुकाराम पाटील**









## कार्यक्रमातील क्षणचित्रे

**स्मॅक आयटीआय भवनचे उद्‌घाटनप्रसंगी उपस्थित कमिन्स इंडिया लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. अश्वथ राम, मुख्य पुरवठा अधिकारी श्री. शुभंकर चटर्जी, मुख्य वित्त अधिकारी श्री. अजय पाटील, सीबीएस इंडिया लीडर श्री. जतिन भाटिया, परचेसिंग लीडर श्री. विपिन कौल.**





उद्योगमंत्री ना. उदय सामंत यांचे स्वागत करताना श्री. एम. वाय. पाटील व श्री. सुरेंद्र जैन.




कार्यशाळेप्रसंगी मार्गदर्शन करताना आयआयएफचे श्री. सचिन शिरगावकर.




सन २०२३ चे बजेट सेमिनारप्रसंगी सीएमए अशोक नवल यांचा सत्कार सोबत सीए मनोज भिडे व सीए सौरभ लाहोटी.




कार्यशाळेप्रसंगी प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. दीपक पाटील यांचा सत्कार. सोबत कामगार कल्याण निरीक्षक राजेंद्र निकम, परिवहन निरीक्षक शंभूराजे पवार.

# ‘स्मॅक’ने राबविलेले उपक्रम

## कार्यशाळांचे आयोजन

**शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन कोल्हापूर स्मॅक व दि इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन फौंड्रीमेन, कोल्हापूर चॅप्टर आयआयएफ यांच्या संयुक्त विद्यमाने खालील निशुल्क कार्यशाळांचे यशस्वी आयोजन करण्यात आले.**

- श्री. निशिकांत एजरेकर, महाव्यवस्थापक सथवारो कोटिंग्ज प्रा. लि., मुंबई यांचे 'रेफ्रेक्ट्री कोटिंग्स – वर्गीकरण आणि नियंत्रणे' (मंगळवार, दि. १७/०१/२०२३)
- श्री. सोहन तिवडे, लेखक, कार्पोरेट सॉफ्ट स्किल प्रशिक्षक आणि व्याख्याते यांचे 'अत्यंत प्रभावी लोकांच्या ७ सवयी' (बुधवार, दि. २२/०२/२३)
- श्री. मनोज कांबळे, सल्लागार इंडेस सोल्युशन्स मुंबई यांचे 'औद्योगिक सुरक्षा आरोग्य आणि पर्यावरण व्यवस्थापन' (रविवार, दि. १९/०३/२०२३)
- श्री. संदीप कुलकर्णी, महाव्यवस्थापक अदिती इंडस्ट्रीज यांचे 'समस्या सोडवण्याची तंत्र आणि दोषांचे विश्लेषण' – सत्र पहिले (मंगळवार, दि. ०४/०७/२०२३)
- श्री. व्ही. श्रीनिवास रेड्डी, कार्यकारी संचालक सिनर्जी ग्रीन इंडस्ट्रीज लिमिटेड यांचे 'फौंड्रीमध्ये कार्यक्षमता सुधारण्यासाठी व्यवहारिक पद्धत' (रविवार, दि. ३०/०७/२०२३)
- श्री. संदीप कुलकर्णी महाव्यवस्थापक अदिती इंडस्ट्रीज यांचे 'कास्टिंग समस्या सोडवण्याचे तंत्र आणि दोष विश्लेषण' सत्र दुसरे (शनिवार दि.१२/०८/२०२३)
- स्मॅक, भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या ईपीसी इंडिया व अन्य संघटनांच्या संयुक्त विद्यमाने निर्यातविषयक क्षमता निर्माण करण्याबाबतच्या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. (मंगळवार, दि. २०/१२/२०२२)
- भारत सरकारच्या एमएसएमई डेव्हलपमेंट ऑफ फॅसिलिटेशन व अन्य औद्योगिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने भारत सरकारद्वारा एमएसएमई शाश्वत झेडईडी प्रमाण योजनेंतर्गत घोषित केलेल्या योजना आणि सबसिडीची माहिती देण्याकरिता 'आजादी का अमृत महोत्सव'अंतर्गत जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. (मंगळवार, दि. २७/१२/२०२२)
- स्मॅक व बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजक विश्वासाठी लघुउद्योग ग्राहकांशी सुसंवाद समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी बँकेद्वारे दिल्या जाणाऱ्या विविध कर्ज योजनांची माहिती दिली. (गुरुवार, दि. १२/०१/२०२३)
